# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

### हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा



माय पुणे जिल्हा उत्तर ५ पुढारी पुणे, शनिवार १२ ऑगस्ट २०१७

**राजगुरुनगरला वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन**

राजगुरुनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात बुधवार, दि. २३ ऑगस्ट रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दिली. महाविद्यालयात दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस प्रेरणादिन म्हणून साजरा केला जातो. हुतात्मा राजगुरूंच्या स्मृतीस अभिवादन म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्पर्धेचे हे २८ वे वर्ष आहे. या स्पर्धेच्या विषयांमध्ये प्रामुख्याने शेतकरी संप : हित आणि फलित, विनोदी साहित्यिक - पु. ल. देशपांडे, शरद पवार - एक राजकीय प्रवास, तरुणाई आणि मोबाईलचा अतिवापर असे आहेत. या स्पर्धेसाठी आकर्षक करंडक म्हणून हुतात्मा राजगुरू चषक व साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहेत. वैयक्तिक बक्षिसांमध्ये प्रथम क्रमांक ७ हजार ५०० रुपये व करंडक, द्वितीय क्रमांक ५ हजार रुपये व करंडक आणि तृतीय क्रमांक ३ हजार रुपये व करंडक आणि खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. व अरिहंत ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था यांच्याकडून उत्तेजनार्थ ५ बक्षिसे प्रत्येकी २ हजार रुपये तसेच सांघिक बक्षीस ५ हजार एक रुपये व करंडक याप्रमाणे आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपला प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवून या स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, स्पर्धा संयोजन समिती प्रमुख प्रा. ए. बी. कानडे यांनी केले आहे.



लोकमत पुणे, शुक्रवार, दि. ११ ऑगस्ट २०१७ ३

**आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा**

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात २३ ऑगस्ट रोजी 'हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धे'चे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी दिली. स्पर्धेचे हे २८वे वर्ष आहे. या स्पर्धेचे विषय शेतकरी संप : हित आणि फलित, विनोदी साहित्यिक - पु. ल. देशपांडे, ना. श्री. शरदरावजी पवार - एक राजकीय प्रवास, तरुणाई आणि मोबाईलचा अतिवापर असे आहेत. या स्पर्धेसाठी, वैयक्तिक, उत्तेजनार्थ आणि सांघिक अशी विविध बक्षिसे आहेत.

सकाळ
पुणे, शनिवार
४

# राजगुरुनगरला २३ रोजी आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

राजगुरुनगर, ता. ११ : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात २३ ऑगस्ट रोजी 'हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे' आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दिली.

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांची जयंती २४ ऑगस्टला असते. त्यानिमित्त महाविद्यालयात या स्पर्धेचे आयोजन केले जाते. 'शेतकरी संप : हित आणि फलित', 'विनोदी साहित्यिक - पु. ल. देशपांडे', 'नामदार शरदरावजी पवार - एक राजकीय प्रवास' आणि 'तरुणाई आणि मोबाईलचा अतिवापर' हे या वर्षीचे स्पर्धेचे विषय आहेत. विजेत्यास हुतात्मा राजगुरू चषक दिला जातो. तसेच वैयक्तिक विजेत्यांना रोख बक्षिसांबरोबर 'साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृतिचिन्ह' देण्यात येते. या स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपला प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील आणि स्पर्धा संयोजन समिती प्रमुख प्रा. ए. बी. काळडे यांनी केले आहे.

लोकसत्ता [पुणे]
शनिवार, १६ सप्टेंबर २०१७

# कॅम्पसकट्टा

तरुणाईचे माध्यमपर्व...

## राजगुरू वक्तृत्व स्पर्धेत ऋग्वेद काळे विजयी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातर्फे आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील एकूण २२ महाविद्यालयांतील ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. या वर्षी स्पर्धेसाठी 'शेतकरी संप : हित आणि फलित', 'विनोदी साहित्यिक - पु. ल. देशपांडे', 'शरदरावजी पवार - एक राजकीय प्रवास', 'तरुणाई आणि मोबाइलचा अतिवापर' असे विषय होते. या स्पर्धेत नाशिक येथील एस.आय.टी. महाविद्यालयाच्या श्वेता भामरे व विवेक चित्ते यांनी सांघिक विजेतेपदाचा चषक मिळाला.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी ऋग्वेद काळे याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक निकिता पाटील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), तृतीय क्रमांक अंकिता शिंदे (रखमाई महिला महाविद्यालय राजगुरुनगर) यांना मिळाला. काजल पेखळकर (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर), आदित्य जवळकर (एस.पी.कॉलेज, पुणे), शुभम माळी (सी कॉलेज, राजगुरुनगर), शशिकांत राऊत (मॉडर्न कॉलेज पुणे), पंकज पाटील (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर), अशोक शिंदे (महात्मा फुले महाविद्यालय अहमदनगर), रूपाली गिरमले (अहमदनगर कॉलेज, अहमदनगर), गोविंद राठोड (कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण), निखिल नागरकर (अहमदनगर कॉलेज, अहमदनगर), शुभम गवळी (नाशिक) यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक सुशील शिंगवी, अंकुश कोलेकर, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष आनंद काळे, प्राचार्य डॉ एस. बी. पाटील, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. एस. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे यांच्या उपस्थितीत झाला. परीक्षक म्हणून तळेगाव इनामदार महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. संदीप सांगळे, भोर येथील अनंतराव थोपटे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. साईनाथ पाचारणे व केसरीचे पत्रकार किरण खुडे यांनी काम पाहिले.

१० केसरी पुणे, १४ ऑगस्ट २०१७

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात दि. २३ ऑगस्ट रोजी 'हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे' आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली.

महाविद्यालयात दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस प्रेरणादिन म्हणून साजरा केला जातो. हुतात्मा राजगुरूंच्या स्मृतीस अभिवादन म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेच्या निमित्ताने दरवर्षी महाविद्यालयात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या वक्तृत्व शैलीचा आविष्कार दाखवण्याची संधी मिळत असते. या स्पर्धेचे विषय शेतकरी संप : हित आणि फलित, विनोदी साहित्यिक- पु. ल. देशपांडे, मा. श्री. शरदरावजी पवार- एक राजकीय प्रवास, तरुणाई आणि मोबाईलचा अतिवापर असे आहेत.

या स्पर्धेसाठी, वैयक्तिक, उत्तेजनार्थ आणि सांघिक अशी विविध बक्षिसे असून त्यामध्ये रोख रक्कम, प्रशस्तिपत्रक आणि आकर्षक करंडक म्हणून हुतात्मा राजगुरू चषक व साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहेत. (वैयक्तिक बक्षीस : प्रथम क्रमांक ७ हजार ५०० व करंडक, द्वितीय क्रमांक ५ हजार व करंडक आणि तृतीय क्रमांक ३ हजार व करंडक आणि खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. व अरिहंत ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था यांच्याकडून उत्तेजनार्थ ५ बक्षिसे प्रत्येकी २ हजार तसेच सांघिक बक्षीस ५ हजार एक रुपया व करंडक)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपला प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवून या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, स्पर्धा संयोजन समिती प्रमुख प्रा. ए. बी. काहाळे यांनी केले आहे.

०४ प्रभात पुणे, शुक्रवार, दि. २५ ऑगस्ट २०१७

# नाशिकचे भामरे, चित्ते हुतात्मा राजगुरू चषकाचे मानकरी

## हुतात्मा राजगुरू जयंतीनिमित्त आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण : राजगुरुनगरचा ऋग्वेद प्रथम

राजगुरुनगर, दि. २४ (प्रतिनिधी)- हुतात्मा राजगुरू जयंतीनिमित्ताने हुतात्मा राजगुरू वक्तृत्व स्पर्धेत सांघिक विजेतेपदाचा चषक नाशिकच्या एस. आय. टी. महाविद्यालयातील श्वेता भामरे व विवेक चित्ते यांच्याकडे तर राजगुरुनगरच्या ऋग्वेद काळेचा प्रथम क्रमांक आला आहे.




हुतात्मा राजगुरू यांच्या जयंतीनिमित्ताने आयोजित आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस स्वीकारताना ऋग्वेद काळे.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात थोर क्रांतिकारक हुतात्मा राजगुरू यांच्या जयंतीनिमित्ताने या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडितराव पलांडे, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे यांच्यासह राज्यभरातून आलेले स्पर्धक, महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेचे हे २८ वे वर्ष आहे. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील एकूण २२ महाविद्यालयातील सुमारे ४७ स्पर्धक विद्यार्थी सहभागी झाले. यावर्षी स्पर्धेत शेतकरी संप : हित आणि फलित, विनोदी साहित्यिक - पु. ल. देशपांडे, मा. श्री. शरदरावजी पवार - एक राजकीय प्रवास, तरुणाई आणि मोबाईलचा अतिवापर असे विषय होते.

स्पर्धेचे बक्षीस वितरण खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक सुशील शिंगवी, अंकुश कोळेकर, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष आनंद काळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे यांचे हस्ते झाले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून कडेगाव इथल्या महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. संदीप सांगळे, मोरया [illegible] महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. साईनाथ पाचारणे, पत्रकार किरण खुडे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा संयोजन समिती प्रमुख प्रा. ए. बी. काहाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. व्ही. बी. टेंढेकर व प्रा. डी. व्ही. बोऱ्हाडे यांनी केले. परीक्षकांचा परिचय प्रा. ए. ई. शिंदे यांनी केला. निकालवाचन प्रा. एस. व्ही. खेसे यांनी केले तर प्रा. पु. पी. जगताप यांनी आभार मानले.

### स्पर्धेतील विजेते (कंसात महाविद्यालय)

प्रथम : ऋग्वेद काळे (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर), द्वितीय : निकिता पाटील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), तृतीय : अंकिता शिंदे ([illegible] महिला महाविद्यालय, राजगुरुनगर) उत्तेजनार्थ : काजल घोलवडकर (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर), आदित्य जवळकर (एस. पी. कॉलेज, पुणे), शुभम वाडगे ([illegible] कॉलेज, राजगुरुनगर), शशिकांत राऊत (मॉडर्न कॉलेज, पुणे), पंकज पाटील (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर), अशोक शिंदे (महात्मा फुले महाविद्यालय, अहमदनगर), रूपाली निमसे (अहमदनगर कॉलेज, अहमदनगर), गोविंद राठोड (कला व वाणिज्य महाविद्यालय, [illegible]), निखिल नालकर (अहमदनगर कॉलेज, अहमदनगर), शुभम गव्हाणे (नाशिक)

लोकमत
पुणे, शनिवार,
दि. २६ ऑगस्ट २०१७

# स्वातंत्र्याची जपणूक करा!

## देवेंद्र बुट्टेपाटील : वक्तृत्व स्पर्धेत राजगुरुनगरच्या ऋग्वेद काळे याचा प्रथम क्रमांक

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : स्वातंत्र्य मिळवण्यासाठी हजारो देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी दररोज आपले जवान शहीद होत आहेत. हे लक्षात घेऊन त्याची जपणूक करण्याची सध:स्थितीत खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडितराव पलांडे यांनी या प्रसंगी बोलताना विद्यार्थी व शिक्षकांनी आपले काम प्रामाणिकपणे करण्याची गरज व्यक्त केली.

या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. या कार्यक्रमात शुभदा धुमाळ, अमृता लोणारी या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली.

या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी ऋग्वेद काळे याने प्रथम क्रमांक पटकाविला. त्या राजश्री महाविद्यालय



प्रथम क्रमांक पुरस्कार स्वीकारताना ऋग्वेद काळे.

### ४० स्पर्धक विद्यार्थी सहभागी

स्पर्धेचे हे २८ वे वर्ष आहे. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील एकूण २२ महाविद्यालयातील सुमारे ४० स्पर्धक विद्यार्थी सहभागी झाले. या वर्षी स्पर्धेचे विषय शेतकरी संप : हित आणि फलित, चिरंतन साहित्यिक - पु. ल. देशपांडे, मा. श्री. शरदरावजी पवार - एक राजकीय प्रवास, तरुणाई आणि मोबाईलचा अतिवापर असे होते.

नाशिकच्या श्वेता भामरे व विवेक चिले यांनी सांघिक विजेतेपदाचा चषक व ५००० रु. पारितोषिक देण्यात आले. द्वितीय क्रमांक निकिता पाटील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ५०००/- व करंडक) व तृतीय क्रमांक अंकिता शिंदे (रत्नाई महिला महाविद्यालय राजगुरुनगर ३०००/- व करंडक) यांनी पटकविला. रोख रक्कम, हुतात्मा राजगुरु चषक व साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे या बक्षिसांचे स्वरूप होते.

उत्तेजनार्थ बक्षिसे काजल पोखरकर (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर), आदित्य जाधवकर (एस.पी.कॉलेज पुणे), शुभम पाचारणे (लॉ कॉलेज राजगुरुनगर), शशिकांत राऊत (मॉडर्न कॉलेज पुणे), पंकज पाटील (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर), अशोक शिंदे (महात्मा फुले महाविद्यालय अहमदनगर), रुपाली निगळे (अहमदनगर कॉलेज अहमदनगर), गोविंदा राठोड (कला व वाणिज्य महाविद्यालय पाबळ), निखिल नगरकर (अहमदनगर कॉलेज, अहमदनगर), शुभम चव्हाणे (नाशिक) अशा १० विद्यार्थ्यांना देण्यात आली.

स्पर्धेचे बक्षीस वितरण खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक सुशील शिंगवी, अंकुश कोळेकर, खोडी विद्री संघाचे अध्यक्ष आनंदराव काळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. पी. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे यांचे हस्ते झाले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून तळेगाव इंद्रायणी महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. संदीप सांगळे, भोरच्या अनंतराव थोपटे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. साईनाथ पाचारणे व किरण खुडे यांनी काम पाहिले.

# नाशिकच्या 'एसआयटी'ला सांघिक विजेतेपद

## हुतात्मा राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा; ऋग्वेद काळे प्रथम

राजगुरुनगर, ता. २५ : हुतात्मा राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचा सांघिक विजेतेपदाचा चषक नाशिकच्या एसआयटी महाविद्यालयाने पटकाविला. येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या ऋग्वेद काळे याने प्रथम क्रमांक मिळविला.

स्पर्धेचे हे २८ वे वर्ष आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील २२ महाविद्यालयांतील ४० स्पर्धक सहभागी झाले होते. नाशिकच्या एसआयटी महाविद्यालयाच्या श्वेता भामरे व विवेक चिते यांना सांघिक विजेतेपदाचा चषक व पाच हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे : प्रथम- ऋग्वेद काळे (पारितोषिक ७ हजार ५०० रुपये, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर), द्वितीय- अंकिता पाटील (५ हजार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) व तृतीय- अंकिता शिंदे (३ हजार, रत्नाई महिला महाविद्यालय, राजगुरुनगर).



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या सांघिक विजेतेपदाचा चषक स्वीकारताना नाशिकच्या एसआयटी महाविद्यालयाची श्वेता भामरे व विवेक चिते.

उत्तेजनार्थ बक्षिसे : काजल पोखरकर (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर), आदित्य जवळकर (एसपी कॉलेज, पुणे), शुभम गाढवे (लॉ कॉलेज, राजगुरुनगर), शशिकांत राऊत (मॉडर्न कॉलेज, पुणे), पंकज पाटील (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर), आलोक शिंदे (महात्मा फुले महाविद्यालय, नगर), रूपाली शिरसाठे (नगर कॉलेज, नगर), गोविंद राठोड (कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण), निखिल नागरकर (नगर कॉलेज, नगर), शुभम गव्हाणे (नाशिक). प्रत्येकी दोन हजार रुपये व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप होते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडितराव पलांडे आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक सुशील शिंगवी, अंकुश कोलेकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष आनंदराव काळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एन. एन. ओ. प्रा. जी. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.



विजेत्या स्पर्धकास करंडक प्रदान करताना मान्यवर.

# वक्तृत्व स्पर्धेत ऋग्वेद काळे प्रथम

राजगुरुनगर : प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेतील विजेत्यांना विविध बक्षिसे आणि पारितोषिक यावेळी प्रदान करण्यात आले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडितराव पलांडे, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. डी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे आदी यावेळी उपस्थित होते. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील एकूण २२ महाविद्यालयातील सुमारे ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेचे विषय शेतकरी संप : हित आणि फलित, विनोदी साहित्यिक पु. ल. देशपांडे, मा. श्री. शरद पवार - एक राजकीय प्रवास, तरुणाई आणि मोबाईलचा अतिवापर असे होते. या स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी ऋग्वेद काळे याने प्रथम क्रमांक पटकावला. एस.आय.पी. महाविद्यालय नाशिकच्या श्वेता भागवे व विवेक चिते यांनी सांघिक विजेतेपदाचा चषक व ५००० रु. पारितोषिक पटकावले.

स्पर्धेत- प्रथम क्रमांक ऋग्वेद काळे (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर ७ हजार ५०० रु. व करंडक), द्वितीय क्रमांक निकिता पाटील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ५००० रु. व करंडक) व तृतीय क्रमांक अंकिता शिंदे (राजर्षी महिला महाविद्यालय राजगुरुनगर ३००० रु. व करंडक) यांनी पटकावला. रोख रक्कम, हुतात्मा राजगुरू चषक व साहेबराव बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे या बक्षिसांचे स्वरूप होते.

प्रत्येकी २००० रु. व प्रमाणपत्र अशा स्वरूपात उत्तेजनार्थ बक्षिसे काजल पोखरकर (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर), आदित्य जवळकर (एस.पी. कॉलेज पुणे), शुभम गाडगे (लॉ कॉलेज राजगुरुनगर), शशिकांत राऊत (मॉडर्न कॉलेज पुणे), पंकज पाटील (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर), अशोक शिंदे (महात्मा फुले महाविद्यालय अहमदनगर), रूपाली गिरवले (अहमदनगर कॉलेज अहमदनगर), गोविंद राठोड (कला व वाणिज्य महाविद्यालय चाकण), निखिल नागरे (अहमदनगर कॉलेज अहमदनगर), शुभम गव्हाणे (नाशिक) अशा १० विद्यार्थ्यांना देण्यात आली.

स्पर्धेचे बक्षीस वितरण खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक सुशील शिंगवी, अंकुश कोळेकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष आनंदराव काळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. डी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे यांच्या हस्ते करण्यात आले.

तळेगाव दाभाडे महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. संदीप सांगळे, भोरच्या अनंतराव थोपटे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. साईनाथ पाचारणे व पत्रकार किरण खुडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

स्पर्धा संयोजन समिती प्रमुख प्रा. द. बी. काळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. व्ही. बी. दौंडकर व प्रा. डी. व्ही. बोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले. परिचय प्रा. द. ई. शिरळे यांनी केला. निकाल वाचन प्रा. एस. व्ही. खेडे यांनी केले. प्रा. यु. पी. जगताप यांनी आभार मानले.

खेड टाईम्स
१ ते ७ सप्टेंबर २०१८/४

# वक्तृत्व स्पर्धेत ऋग्वेद काळे अव्वल

**राजगुरूनगर, (प्रतिनिधी)** - हुतात्मा राजगुरू वक्तृत्व स्पर्धेचा सांघिक विजेतेपदाचा चषक नाशिकच्या श्वेता भामरे व विवेक चित्ते यांच्याकडे, तर राजगुरूनगरच्या ऋग्वेद काळे याने प्रथम क्रमांक पटकावला.

या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी ऋग्वेद काळे याने प्रथम क्रमांक पटकविला, तर एस.आय.टी. महाविद्यालय नाशिकच्या श्वेता भामरे व विवेक चित्ते यांनी सांघिक विजेतेपदाचा चषक व पाच हजार रुपये पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेत प्रथम क्रमांक ऋग्वेद काळे (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर ७५०० रु. व करंडक), द्वितीय क्रमांक निकिता पाटील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पाच हजार रुपये व करंडक) व तृतीय क्रमांक अंकिता शिंदे (रत्नाई महिला महाविद्यालय, राजगुरूनगर तीन हजार रुपये व करंडक) यांनी पटकविला.

प्रत्येकी दोन हजार रुपये व प्रमाणपत्र अशा स्वरूपात उत्तेजनार्थ बक्षिसे काजल पोखरकर (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर), आदित्य जवळकर (एस. पी. कॉलेज, पुणे), शुभम गाडगे (चिंधी महाविद्यालय, राजगुरूनगर), शशिकांत राऊत (मॉडर्न कॉलेज पुणे), पंकज पाटील (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर), अशोक शिंदे (महात्मा फुले महाविद्यालय, अहमदनगर), रूपाली गिरवले (अहमदनगर कॉलेज, नगर), गोविंदा राठोड (कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण), निखील नगरकर (अहमदनगर कॉलेज, नगर), शुभम गव्हाणे (नाशिक) अशा १० विद्यार्थ्यांना देण्यात आली.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख